पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

## संपादकीय

# ग्रामीण स्तरावर रोजगारसंधी उपलब्ध होणे गरजेचे



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

भारत हा कृषिप्रधान आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या सर्वाधिक असलेला देश असला तरीही, या भागातील समाजाला रोजगाराच्या संधी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध झालेल्या नाहीत. ग्रामीण भागात कृषी क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रातही रोजगार वाढविण्यासाठी अनेक पर्याय आहेत. कृषी क्षेत्राच्या शेतातील उत्पादनाबरोबरच उत्पादन काढल्यानंतर ग्राहकांच्या घरात पोहोचेपर्यंतच्या सर्व प्रक्रिया या खेड्यामध्येच करणे गरजेचे आहे. फळे, भाजीपाला, धान्य, तेलबिया, कडधान्ये, दुग्ध व्यवसाय, पशुपालन हे सर्व व्यवसाय खेड्यामध्येच आहेत. त्यावर पाहिजे त्या प्रकारच्या प्रक्रिया किंवा काढणीपश्चात आवश्यक ते संस्करण करण्याच्या सर्व यंत्रणा खेड्यामध्ये उभ्या राहिल्या तर त्यातून मोठ्या प्रमाणात गावामध्येच रोजगार निर्मिती होऊ शकेल. तसेच शहरातील लोकसंख्यावाढ हा गंभीर प्रश्न कमी होण्यास मदत होईल.

### स्थानिक स्तरावर शेतीमाल प्रक्रियाकेंद्रे हवीत

आज अशा प्रकारच्या सुविधा नसल्यामुळे एक तर शेतमालाची नासाडी होते तर दुसऱ्या बाजूला ग्राहकांना पाहिजे त्या वेळी, पाहिजे त्या प्रमाणात किंवा पाहिजे त्या पध्दतीने शेतीमाल मिळत नाही. वातावरणामध्ये होत असलेल्या बदलांमुळे भविष्यात शेती उत्पादनावर अनिष्ट परिणाम होणार आहे याचा विचार करून शेतातील माल शेतात, गावातील माल गावातच योग्य पध्दतीने पॅकिंग, ग्रेडिंग व इतर योग्य संस्करण करून ग्राहकांपर्यंत पोहचू शकला तर शेतमालाची नासाडी थांबविणे शक्य होईल. यातून मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्तरावर रोजगार निर्माण होणे शक्य असले तरीही संबंधितांना योग्य प्रकारचे कौशल्य शिक्षण देण्याची सुविधा आजही उपलब्ध नाही. आपल्या देशातील आर्थिक सुबत्ता वाढत असताना ग्राहकांच्या फूड बास्केटमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. आजचा ग्राहक भाजी, भाकर, कांदा, चटणीच्या पुढे गेलेला असून

त्याला विविध प्रकारची शेती उत्पादने त्यांच्या फूड बास्केटमध्ये गरजेची वाटतात. याचाच विचार करून शेतीमध्ये ग्राहकांच्या गरजेनुसार आणि मागणीनुसार उत्पादन काढण्यासाठी कौशल्यपूर्ण शिक्षण देण्याची गरज आहे. पारंपरिक कृषी शिक्षण पध्दतीतून तयार होणाऱ्यांकडून या बाबींची पूर्तता होत नाही. ग्राहकांच्या तसेच मार्केटच्या गरजेनुसार उत्पादन घेण्यासाठी तंत्रज्ञान, माहिती आणि त्यामध्ये वारंवार अद्ययावत बदल करण्यासाठीच्या शिक्षणाची गरज आज ग्रामीण भागाला आहे. तसेच वातावरणातील बदलानुसार उत्पादन काढणे ही एक मोठी कसरत शेतकऱ्यांना करावी लागणार आहे. त्यासाठी तंत्रज्ञान, नवनवीन माहितीसेवा, तंत्रसुविधा, निविष्ठा, सल्ला, प्रकल्प तयार करणे यामध्ये फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीच्या वाटा आज ग्रामीण भागात उपलब्ध होत आहेत, ही समाधानाची बाब आहे.

## कृषितंत्रात बदल होत आहे

शेती क्षेत्रामध्ये आज तरुणांची शारीरिक कष्टांपेक्षा बौद्धिक आणि यांत्रिक पध्दतीने शेती करण्याची मानसिकता तयार होत आहे. शेतीमध्ये प्लॅस्टिकचा वापर, सिंचनाच्या आधुनिक पध्दती, फर्टिगेशन, मशागती, आंतरमशागती, काढणी यासारखी कामे मशिनरी आणि अवजारांच्या सहाय्याने करण्याची मानसिकता वाढत आहे. नियंत्रित वातावरणामध्ये शेती उत्पादन, बाजारपेठेच्या मागणीनुसार पिकांचे उत्पादन, पॅकिंग व विक्री यासारख्या नवनवीन प्रयोगांचा अवलंब वाढत आहे. या सर्व आधुनिकतेची गरज असताना त्यासाठी कुशल कामगार उपलब्ध होत नाहीत. आज अनेक क्षेत्रांमध्ये करार पध्दतीने उत्पादनाची संकल्पना पुढे येत आहे. त्यासाठी नियोजित उत्पादन घेण्यासाठी सर्व कामे काटेकोर पध्दतीने करण्याची गरज असते.

अशा प्रकारच्या काटेकोर शेतीसाठी कुशल कामगारांची गरज असते. शेतकऱ्यांच्या शेतात त्यांना पाहिजे तेव्हा आणि गरजेनुसार कृषी तंत्रज्ञान पोहचविण्याची यंत्रणा कोलमडलेली आहे. शेती तंत्रज्ञानाचा प्रसार फक्त माहिती देऊन पूर्ण होत नाही तर त्यासाठी वरचेवर भेटी आणि सेवा दिली तरच त्याचा यशस्वी अवलंब होऊन उत्पादनात वाढ होते. यासाठी अशा सेवा सुविधा देणाऱ्यांची गरज असून त्यापासून रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. ज्याप्रमाणे दुग्ध व्यवसायामध्ये खासगी सेवा देणाऱ्यांमुळे आज या व्यवसायाला मोठी चालना मिळाली त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रातही या सर्व सेवा-सुविधा देण्याची गरज आहे. हवामानात बदल होत असताना कृषी क्षेत्राला विम्याचे संरक्षण मिळणे फार गरजेचे आहे.

## दुग्धव्यवसाय आणि फलोत्पादन ठरले लाभदायी

आपल्या राज्याला मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी मिळाल्या त्या दुग्धव्यवसाय आणि फलोत्पादनामुळे. वीस वर्षांपूर्वी अवघे २.४२ लाख हेक्टर क्षेत्र फळबागेखाली होते. त्याचे प्रमाण आज १८ लाख हेक्टरपर्यंत गेलेले आहे आणि त्यात सतत वाढच होत आहे. एकूण कृषी उत्पादनापैकी फलोत्पादन क्षेत्राचा वाटा ३६ टक्के असून दुग्ध व्यवसायाचा वाटा १३ टक्के आहे. म्हणजेच या दोन क्षेत्रांचा वाटा ३९ टक्के असून एकूण क्षेत्राचा विचार केला तर अत्यंत कमी क्षेत्र या दोन व्यवसायांखाली अडकलेले आहे. तसेच रोजगाराचा विचार केला तर एकूण कृषी क्षेत्राच्या रोजगारापैकी ५५ ते ६० टक्के रोजगार या दोन क्षेत्रांतून मिळतो. फलोत्पादन क्षेत्राचा जागतिकदृष्ट्या विचार केला तर एकूण उत्पादनाच्या फक्त २ ते ३ टक्केच उत्पादन निर्यात होते. म्हणजेच या क्षेत्रात निर्यातवृध्दीला वाव आहे. नियंत्रित वातावरणात फळे, भाजीपाला, फुलांची शेती तसेच सुगंधी व औषधी वनस्पतींची लागवड यासारख्या तंत्रज्ञानाचाही वापर वाढणे गरजेचे आहे. दुग्ध व्यवसायापासून शेतकरी दूर जात आहे कारण

यासाठी मजुरांची उपलब्धता होत नाही. पारंपरिक गो-पालनाऐवजी मुक्तसंचार गोठा पध्दतीने दुग्ध व्यवसाय सुरु केला तर यामध्ये मजूर कमी लागतात. आधुनिक मशिनरी आणि अवजारांचा वापर केला तर स्वच्छ दूधनिर्मितीबरोबरच कमी मजुरांमध्ये दुग्ध व्यवसाय सहज शक्य आहे, असे काम करायला आजचा तरुण सहज तयार होईल.

## कृषिप्रधान देश; मात्र शेतकरीच दुर्लक्षित!

मागील तीन-चार दशकांपासून कृषी क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात बदलला आहे. उच्च शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरीच्या विरूध्द स्थिती झाली आहे. शेती ही कनिष्ठ झाली असून प्रत्येकाला नोकरी पाहिजे. कारण नोकरीवाल्याला समाजामध्ये मानसन्मान आहे. शेती करणाऱ्याला समाजामध्ये मान-सन्मान नाही. जगामध्ये भारत कृषिप्रधान देश परंतु याच देशात शेती करणाऱ्यांना मानसन्मान नाही. शेतीमध्ये करिअर करणाऱ्या, प्रयोग करणाऱ्या आणि सतत काहीतरी नवीन करून दाखविणाऱ्यांनाही समाज मानसन्मान देत नाही. सध्या परिस्थिती एवढी हाताबाहेर गेली की, 'शेतकरी नवरा नको गं बाई' या मानसिकतेमुळे घरी चांगली शेती व कृषी उद्योगातून चांगले अर्थार्जन होत असूनही तरुण कमी पगाराची नोकरी पत्करतात. तरुणी शेतकरी मुलांसोबत लग्न करायला तयार नाही तर तरुण शेतीमध्ये काम करायला तयार नाही. शेतीक्षेत्र निश्चितच बेभरवशाचे आहे. यामध्ये अनिश्चितता मोठी आहे. परंतु हे क्षेत्र नक्कीच एवढे वाईट नाही. समाजाच्या प्रतिकूल दृष्टिकोनात बदल झाला नाही तर तरुण शेतीकडे आकर्षित होणार नाही, या माध्यमातून आपले करिअर करण्याचा विचार करणार नाही.

## कृषी क्षेत्राचा विकासदर राष्ट्राशी निगडित

मागील काही दशकांमध्ये कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर वाढत नसतानाही देशाच्या प्रगतीचा वेग चांगला होता. म्हणून काही अर्थतज्ज्ञांचा असा ग्रह झाला की, कृषी क्षेत्राचा विकास दर आणि देशाच्या विकासाचा दर यांचा संबंध नाही. परंतु ६० टक्के शेतकऱ्यांकडे देशातील एकूण उत्पादनापैकी केवळ ११ ते १२ टक्केच उत्पादन राहिले तर बाजारपेठ कशी फुलणार? आर्थिक देवाण-घेवाण कशी वाढणार? म्हणूनच कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर वाढला तरच भारताच्या एकूण विकासाच्या वाढीचा दर शाश्वत राहू शकतो. पुढील दशकामध्ये भारतीय शेती व्यवसायात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होताना दिसेल. आजही शेतीमध्ये काम करणारा शेतकरी आणि अकुशल कामगार यांना शेतीचे तांत्रिक ज्ञान अत्यंत कमी आहे. त्यांना सेवा-सुविधा देणाराही पाहिजे त्याप्रमाणात प्रशिक्षित नाही. यामध्ये मोठया प्रमाणात बदल होणे अपेक्षित आहे.

'ॲग्री क्लिनिक' आणि 'ॲग्री बिझिनेस'सारखा कोर्स कृषी विषयात शिक्षण घेतलेल्यांना उपलब्ध करण्यात आलेला आहे. याची व्याप्ती वाढण्याची गरज आहे. तसेच प्रत्येक भागाची स्थानिक परिस्थिती, उपलब्ध सोयी सुविधा यांचा विचार करून योग्य त्या तंत्रज्ञानाचा वापर करून निवडलेल्या व्यवसायामध्ये प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाला कौशल्य देण्याची सोय स्थानिक पातळीवर होण्याची गरज आहे. प्रत्येक जिल्हा पातळीवर अशा प्रकारचे कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करून सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करता येईल. यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळ शासनाच्या वतीने दिले पाहिजे. खरं तर ग्रामीण भागात रोजगार निर्मिती ही चळवळ म्हणून उभी राहिली पाहिजे. ज्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण हे सर्वांना बंधनकारक केलेले आहे तसेच कौशल्यावर आधारित शिक्षणासाठीही त्याचप्रमाणे निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा प्रकारची योजना झाली नाही तर एकीकडे काम करणारे हात नाहीत आणि

दुसरीकडे गरजू हातांना काम नाही असे चित्र दिसेल! एकीकडे शेती व्यवसाय कुशल मनुष्यबळाअभावी भकास होईल तर दुसरीकडे गावातील तरुणाई वाईट मार्गाने जाऊन गावे भकास करू लागेल! हवामानावर आधारित कृषी विमा हा शेतकरीभिमुख आणि त्या परिसरातील हवामानातील बदलांवर अवलंबून आहे. ज्याप्रमाणे आज विविध कंपन्या आल्यामुळे माणसांचा विमा उतरविण्याचे प्रमाण वाढले आहे त्यापेक्षा जास्त प्रमाण खरं तर शेती क्षेत्रामध्ये पीकविम्याचे वाढले पाहिजे. कृषी विमा क्षेत्रात बदल होत असून त्यामुळेही मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाला रोजगार मिळण्याचे काम या क्षेत्रातून होणार आहे.

## शेती व्यवसायात मोठी गुंतवणूक आवश्यक

शेती क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी होत आहेत ही बाब खरी नाही. प्रत्यक्ष शेतावर कष्ट न करता शेतीवर आधारित सर्व व्यवसाय, सेवा, सुविधा यांचा विचार केला तर फार मोठा रोजगार आज उपलब्ध आहे आणि पुढेही हा वाढत जाणार आहे. म्हणूनच रोजगार वाढविण्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढविण्याची गरज आहे. यातून ग्रामीण भागाचा विकास होईल, हाताना रोजगार मिळेल, कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर वाढून परकीय चलन वाढविता येईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आज शहरांवर लोकसंख्येच्या वाढीचा जो दबाव वाढतोय तो कमी होईल. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद असताना तो पैसा खर्च होत नाही अशी चर्चा होते. हीच रक्कम ग्रामीण भागातील युवकांना शेती व शेतीपूरक व्यवसायाचे शिक्षण देणे तसेच या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी वापरली तर खऱ्या अर्थाने रोजगाराची हमी निर्माण होईल. परंतु अशा प्रकारचे प्रयत्न होत नाहीत. 'आजार बोटाला आणि औषध पोटाला' अशी गत आपल्या अनेक योजनांमध्ये होत असते.

ग्रामीण भागातील युवकांचे प्रश्न आणि समस्या जाणून घेतल्या पाहिजेत. युवकांना कृषी क्षेत्रात कष्ट करणे आवडत नाही अशी फक्त चर्चा करुन शांत बसण्याऐवजी; त्यांचे कष्ट कमी करण्यासाठी यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरणाद्वारे त्यांचे या क्षेत्राबाबतचे आकर्षण वाढविले तर निश्चितच ते अशा व्यवसायाकडे वळतील. आजचा ग्रामीण तरुण शहरातील तरुणांबरोबर तुलना करुन त्यांच्याकडे असलेल्या सुविधा काही प्रमाणात का होईना आपल्याकडे असाव्यात, अशी अपेक्षा ठेवू लागला आहे. त्यासाठी त्याला शेती आणि शेतीपूरक व्यवसाय, योग्य उत्पादन, गरजेनुसार आर्थिक फायदा आणि राहणीमानामध्ये सुधारणा करण्यासाठीच्या सोयी-सुविधा या अपेक्षा आहेत. या अपेक्षा पूर्ण झाल्या तरच तो शहराकडील आकर्षण टाळून ग्रामीण भागामध्ये थांबून शेतीपूरक व्यवसाय करेल. भविष्यात वाढलेल्या लोकसंख्येला पोटभर खायला घालायचे म्हटले तर शेती आणि शेतीपूरक व्यवसायांचे मनुष्यबळ वाढविण्याची गरज आहे. यातूनच कृषी क्षेत्राचा विकासदर वाढून राष्ट्राचा एकूण विकासदर वाढेल. तसेच ग्रामीण भागातील तरुणाई या क्षेत्राकडे आकर्षित होऊन बेरोजगारीची समस्या कमी होईल.

■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.